# • शासकीय वसतिगृहे •

मागासवर्गीय मुलामुलीची शिक्षणाची सोय व्हावी, त्यांना उच्च शिक्षण घेता यावे, त्याचप्रमाणे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील मुलामुलींना विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षण घेता यावे, यासाठी शासकीय वसतिगृहे सुरू करण्यात आलेली आहे. सदरची योजना 1922 पासून कार्यान्वित आहे. सद्यः स्थितीत भंडारा जिल्हयात 3 मुलांची व 6 मुलींची अशी एकूण 9 शासकीय वसतिगृहे सुरूआहेत.

## अटी व शर्ती :

१) गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येतो.

२) विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा

३) प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या पालकांचे, वार्षिक उत्पन्न अनु. जातीकरिता 250000/- व इमाव करिता 100000/- पेक्षा जास्त नसावे.

४) इयत्ता ८ वी व त्यापुढे महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी अर्ज करता येईल.

५) अर्ज करावयाची मुदत शालेय विद्यार्थ्यांसाठी १५ मे पूर्वी, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी ३० जून पर्यत किंवा निकाल लागल्यापासून १५ दिवसांचे आंत.

## शासकीय वसतिगृहात खालीलप्रमाणे सोयी-सुविधा देण्यात येतात.

१) मोफत निवास व भोजन, अंथरूण पांघरूण, ग्रंथालयीन सुविधा.

२) शालेय विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी दोन गणवेश दिले जातात.

३) क्रमिक पाठ्यपुस्तके, वहया, स्टेशनरी इत्यादी

४) वैद्यकीय आणि अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमानुसार स्टेथोस्कोप, ॲप्रॉन, ड्रॉईंग बोर्ड

५) बॉयलर सूट व कलानिकेतनच्या विद्यार्थ्यांसाठी रंग, ड्रॉइंग बोर्ड, ब्रश कॅनव्हास इत्यादी.

६) वसतिगृहातील विद्यार्थ्यांना त्यांच्या दैनदिन खर्चासाठी निर्वाहभत्ता दिला जातो.

७) वसतिगृहांमध्ये वाचन प्रेरणा उपक्रम राबविण्यात येतो.